संक्षिप्त

स्वाध्याय परिवाराच्या धनश्री तळवलकर यांचे प्रवचन

छत्रपती संभाजीनगर : स्वाध्याय परिवाराच्या धनश्री (दीदी) तळवलकर यांचे येथील बजाजनगरातील सिडको महानगर मैदानावर शनिवारी सायंकाळी प्रवचन आयोजित करण्यात आले आहे. रक्षाबंधनाच्या निमित्ताने आयोजित या प्रवचनाच्या कार्यक्रमास छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील स्वाध्यायी उपस्थित राहणार असल्याची माहिती परिवाराच्या वतीने देण्यात आली. या कार्यक्रमात स्वाध्यायी युवक व युवती एका विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे दीदींना मानवंदना देणार आहे. कार्यक्रमापूर्वी 'भक्तिफेरी'ही शेकडो गावात पोहोचून रक्षाबंधनाचे महत्त्व सांगत फिरत असल्याचे सांगण्यात आले.

'एमजीएम'मध्ये राष्ट्रीय हातमाग महोत्सव

छत्रपती संभाजीनगर : महात्मा गांधी मिशन विद्यापीठातील 'लिओनार्दो दा विंची स्कूल ऑफ डिझाइन (एलएसओडी)' मध्ये उद्यापासून (गुरुवार) शनिवारपर्यंत (९ ऑगस्ट) तीन दिवसांच्या महोत्सवासह राष्ट्रीय हातमाग दिन साजरा करण्यात येणार आहे. त्याचे उद्घाटन कुलपती अंकुशराव कदम यांच्या हस्ते होणार आहे. यानिमित्त एक खास 'फॅशन शो' आयोजित केला आहे. 'हँडलूम- भारताचा अभिमान' या विषयावर पोस्टर बनवण्याची स्पर्धा आहे. विविध राज्यांतून आलेले ११ प्रमुख विणकर आपले हातमाग सादर करणार आहेत. यात माहेश्वरी, चंदेरी, हिमरू, बागरू प्रिंट, करावती साडी, अज्रख, सोलापुरी चादर आदींचा समावेश असल्याचे संचालिका शुभा महाजन यांनी सांगितले.

उपशिक्षणाधिकारी पदांचे भिजत घोंगडे; शिक्षण विभागाचे एमपीएससीकडे बोट

'सर्वोच्च' आदेशानंतरही नियुक्तीची प्रतीक्षाच

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : सर्वोच्च न्यायालयाने पाच आठवड्यांत याचिकाकर्त्या २७ उपशिक्षणाधिकारी किंवा तत्सम पदांवरील अधिकाऱ्यांना नियुक्ती द्यावी, असे आदेश ३० एप्रिलला दिलेले असतानाही अद्याप त्यातील एकालाही नियुक्ती मिळालेली नाही. २०१७ साली उपशिक्षणाधिकारी पदांची परीक्षा, सप्टेंबर २०२३ मध्ये निकाल लागूनही आणि न्यायालयीन प्रक्रियेचा फेरा होऊनही नियुक्तीच्या संदर्भातील घोंगडे भीजत पडलेले आहे. यासंदर्भाने शिक्षण विभाग महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे बोट दाखवत आहे, तर आयोगाकडून त्यावर कुठलीही प्रतिक्रिया मिळत नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून महाराष्ट्र शिक्षण सेवा व जिल्हा तांत्रिक सेवा संवर्गांतर्गत मर्यादित विभागीय उपशिक्षणाधिकारी पदाच्या अनुक्रमे ३१ व ९२ पदांसाठी २०१७ मध्ये परीक्षा घेण्यात आली होती. तर निकाल १२ सप्टेंबर २०२३ मध्ये लागला. यामध्ये प्राथमिक शिक्षकांनाही पात्र ठरवण्यावरून झालेल्या मागणीचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. त्यावरून काही उमेदवारांनी महाराष्ट्र न्यायाधिकरण प्राधिकरण (मॅट), औरंगाबाद खंडपीठ व सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. मॅटच्या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनानेही धाव घेतली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने पाच आठवड्यांत याचिकाकर्त्या २७ उमेदवारांना नियुक्ती द्यावी, असे आदेश दिले आहेत. ३० एप्रिल रोजी दिलेल्या या आदेशानंतरही आता १५ ते १६ आठवडे उलटून गेल्यानंतरही संबंधित उमेदवारांना अद्याप नियुक्ती देण्यात आली नाही. त्यावरून काही उमेदवारांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. उपशिक्षणाधिकारी पदाची परीक्षा उत्तीर्ण होऊनही २०१७ पासून म्हणजे आठ वर्षांनंतरही नियुक्ती मिळालेली नाही. दिल्लीपर्यंत जाऊन न्यायालयीन लढाई लढूनही झाली आहे. आता घरातूनही बाहेर पडता येत नसून, यश, पदप्राप्तीचा आनंदही विरून गेला आहे. १५ ते १६ आठवडे झाले आहेत. अजूनही नियुक्तीच्या संदर्भातील पत्र प्राप्त झालेले नाही.

शिक्षण उपसचिव मोईन ताशीलदार यांनी 'लोकसत्ता'ला सांगितले की, यासंदर्भातील यादी यापूर्वीच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठवण्यात आली आहे. त्यांच्याकडून पुढील नियुक्तीच्या संदर्भातील यादी काढली जाईल. एमपीएससीकडून यासंदर्भातील प्रक्रिया सुरू असेल.

लातूरमधील २६९ ग्रामपंचायती क्षयरोगमुक्त

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : लातूर जिल्ह्यातील २६९ ग्रामपंचायती क्षयरोगमुक्त झाल्या आहेत. सलग दुसऱ्या वर्षी क्षयरोगमुक्त झालेल्या ३२ ग्रामपंचायतींना मंगळवारी जिल्हाधिकारी वर्षा घुगे-ठाकूर यांच्या हस्ते रौप्य पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत लातूर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत 'क्षयरोगमुक्त (टीबी) गाव माझी जबाबदारी - टीबीमुक्त ग्रामपंचायत' अभियान राबविले जात आहे. पुरस्कारप्राप्त ग्रामपंचायतींचे सरपंच, गटविकास अधिकारी आणि तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी महात्मा गांधी यांची प्रतिमा आणि प्रमाणपत्र स्वीकारले. प्रास्ताविक जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. एस. एन. तांबारे यांनी केले.

उत्तराखंड ढगफुटीमध्ये सोलापूरचे चार तरुण अडकले

सोलापूर : उत्तराखंडमधील उत्तरकाशी येथे झालेल्या ढगफुटीमुळे अनेक भागांत पूर परिस्थिती निर्माण झाली असून, सोलापुरातील चार तरुण भाविक यात अडकून पडले आहेत. मात्र, ते सर्वजण सुखरूप असून, त्यांनी स्वतः सोलापूरकरांना समाज माध्यमातून ही माहिती दिली आहे.

धीरज ऊर्फ धनराज बगले, समर्थ दसाडे, विठ्ठल पुजारी आणि मल्हारी धोत्रे हे तरुण भाविक उत्तराखंडच्या उत्तरकाशीमध्ये अडकले आहेत. सोलापूरच्या जिल्हा प्रशासनाने त्यांच्या सुरक्षिततेबाबत खात्री करून घेतली असून, सद्यस्थितीत सर्वजण सुखरूप असल्याची माहिती मिळाली आहे. गरज पडल्यास पुढील मदतीसाठी आपण यंत्रणाशी संपर्कात असल्याचेही त्यांनी सांगितले.

कन्नड अर्बन सोसायटीमध्ये ८७ लाखांचा गैरव्यवहार

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : कन्नड अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. मधून २०२१ ते २०२३ या कालावधीत ८७ लाख २३ हजार ७६८ रुपयांच्या झालेल्या व्यवहारात ठेवीदार, सभासद व शासनाचा विश्वासघात करून फसवणूक केल्याप्रकरणी १४ जणांविरुद्ध कन्नड ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यामध्ये सोसायटीचे संस्थापक व्यवस्थापक, अध्यक्ष, संचालकांचा समावेश आहे.

याप्रकरणी कन्नड सहकारी संस्था कार्यालयातील उपलेखा परीक्षक शेख सलाऊद्दीन कुदुबद्दीन (वय ५३) यांनी तक्रार दिली आहे. त्यावरून संस्थापक व्यवस्थापक जयंत बाळकृष्ण कुलकर्णी, अध्यक्षा मनीषा जयंत कुलकर्णी, उपाध्यक्ष दशरथ गोरखनाथ सामोसे, संचालक अप्पासाहेब दळे, संजयकुमार पांडे, सचिन जाधव, युवराज चव्हाण, राजू नवले, उमेश नंदकिशोर नाटाणी, शिवाजी धनेश्वर, अर्जुन चव्हाण, सतीश शेजवळ, प्रियांका साळुंके यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपींनी बेकायदेशीरपणे संगनमताने बँकेचे सर्व कायदे नियम, पोटनियम याकडे दुर्लक्ष करून आर्थिक गैरव्यवहार करण्याच्या उद्देशाने ८७ लाख २३ हजार ७६८ रुपयांची ठेवीदार, सभासद व शासनाची फसवणूक केली. विश्वासघात करून बाह्य बिनतारण कर्ज अदा करणे, कर्जरोखे नसताना अदा करणे, एकरकमी कर्ज फेड योजना मंजूर नसताना काही ठरावीक कर्जदारांना सूट देणे, लिंकिंग शेअर्सच्या रकमांबाबत गैरव्यवहार करूनही रोखीने रकमा कर्ज खात्यावर जमा करणे आदी प्रकारातून हा गैरव्यवहार झाल्याचे तक्रारीत नमूद आहे.

आरोपी युवक विजय भांबळे यांचा नातेवाईक

मेघना बोर्डीकर यांच्या विरोधात मजकूर

परभणी : राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्याविषयी अश्लाघ्य भाषेत समाजमाध्यमांवर मजकूर लिहिणाऱ्या पृथ्वी भांबळे या युवकास अटक केली. दरम्यान, खोट्या नोंदणीच्या आधारे पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर यांची बदनामी करणाऱ्या आरोपीच्या विरुद्ध गंभीर स्वरूपाची कलमे लावून कारवाई करण्याची मागणी भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी बुधवारी पोलीस अधीक्षकांकडे केली.

राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे माजी आमदार विजय भांबळे यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केल्यानंतर जिंतूर विधानसभा मतदारसंघात महायुतीतच दररोज खटके उडत असून, भांबळे व बोर्डीकर यांच्यात जोरदार वादाचा भडका उडालेला आहे. बोरी येथील घरकुल लाभार्थी मंजुरी प्रमाणपत्र कार्यक्रमात पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी केलेल्या वक्तव्याच्या अनुषंगाने आमदार रोहित पवार यांनी टीका केल्यानंतर या प्रकरणात भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसवर टीका केली.

रोहित पवार यांना अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे स्थानिक नेते माहिती पुरवत आहेत आणि त्यांच्याच सांगण्यावरून ते बोलत आहेत. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकच आहेत की काय, असा प्रश्न भाजपच्या जिल्हाध्यक्षांनी विचारला होता. भांबळे यांनी पक्षांतर केल्यानंतर पालकमंत्री बोर्डीकर यांच्या विरोधात पत्रकार परिषद घेऊन आरोप-प्रत्यारोप केले. हा वाद पेटलेला असताना मंत्री श्रीमती बोर्डीकर यांच्यावर विष्णू नागरे याने अश्लाघ्य भाषेत मजकूर लिहिला. दिलेल्या तक्रारीनंतर पोलिसांनी कारवाई केल्याचे सांगण्यात येत आहे.

घरून पळालेल्या, अपहरण झालेल्या दोन अल्पवयीन मुलींचा शोध

लोकसत्ता वार्ताहर

नांदेड : आई-वडील रागावल्यामुळे घरातून निघून गेलेल्या तसेच दुसऱ्या एका घटनेत अपहरण झालेल्या दोन अल्पवयीन मुलींना शोधण्यात नांदेड पोलिसांना यश आले. यातील घरातून पळून गेलेल्या मुलीला पोलिसांनी नऊ तासांतच शोधून काढले.

ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका कुटुंबातील पालकांनी अभ्यासासाठी आपल्या मुलीला बुधवारी सकाळी रागावल्यानंतर या मुलीने घरातून पळ काढला. त्यानंतर हा प्रकार लक्षात आल्यानंतर संबंधित पालकांनी ग्रामीण पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार नोंदविली. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन ग्रामीण पोलिसांनी चार पथकांच्या माध्यमातून तपास सुरू केला. घरातून निघून गेलेली ही मुलगी जालना येथे पोहचल्याचे समजल्यानंतर जालना पोलिसांच्या मदतीने तिला ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी या मुलीचे समूपदेशन करून तिला पालकांच्या स्वाधीन केले.

नांदेडमध्ये वरील घटनेचा तपास सुरू असतानाच उस्माननगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका मुलीचे ४ ऑगस्ट रोजी अपहरण करण्यात आले होते. या मुलीचाही बुधवारी शोध लागला. ही अल्पवयीन मुलगी शिकवणीसाठी घराबाहेर पडली होती. परंतु, नंतर घरी न परतल्यामुळे आई-वडिलांनी उस्माननगर पोलीस ठाण्यामध्ये तक्रार नोंदवली.

तब्बल ४८ तासांनंतर ही मुलगी सोलापूर जिल्ह्यातील शिखर शिंगणापूर येथे असल्याचे समजल्यानंतर उस्मानगर पोलीस ठाण्याच्या पथकाने तेथे जाऊन मुलीला ताब्यात घेतले व नातेवाईकांकडे सुपूर्द केले. पोलीस पथकाने तत्काळ केलेल्या या कारवाईचे वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी कौतुक केले आहे.

खंबाटकी बोगद्याजवळ ट्रक उलटला

सातारा: पुणे-बंगळुरू महामार्गावर खंबाटकी बोगद्यापुढील अवघड वळणावर (एस कॉर्नर) झालेल्या अपघातात ब्रेक निकामी झालेल्या मालट्रकने पुढील वाहनाला जोरदार धडक दिली. नंतर बेंगरूटवाडीच्या कच्चा रस्त्यावर जाऊन ट्रक उलटला. क्षणार्धात घडलेल्या अपघाताच्या थराराने महामार्गावर वाहनचालकांत एकच खळबळ उडाली.

महामार्गावर सांगलीहून साखर भरून मुंबईला वाहतूक करणारा मालट्रक (एमएच१० सीआर ४१९७) जात होता. अवघड वळणावरील (एस कॉर्नर) तीव्र उतारावर मालट्रक खंबाटकी बोगदा ओलांडून पुढे आला होता. मार्गावर बलकवडी कालव्याजवळ ट्रकचा एअर पाईप फुटल्याने ब्रेक निकामी झाला. त्यामुळे चालक लखन भिवा दुधाळ (खवे, ता. मंगळवेढा, सोलापूर) याचे ट्रकवरील नियंत्रण सुटले. ट्रक पुढे जाणाऱ्या मोटारीवर (एमएच १४ डीएन १५९६) तो जोरदार आदळला आणि महामार्ग सोडून पुढे जाऊन बेंगरूटवाडीच्या हद्दीत कच्च्या रस्त्यावर जाऊन पलटी झाला. या अपघातामध्ये सुदैवाने जीवितहानी झाली नाही. मात्र, मोटारीतील एक महिला गंभीर जखमी झाली व दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणामध्ये नुकसान झाले आहे. अपघाताची माहिती कळताच खंडाळा पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार प्रकाश फरांदे, संजय पोळ, संजय जाधव व शिरवळ मदत पथक (रेस्क्यू टीम) तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. जखमींना रुग्णवाहिकेतून रुग्णालयात पाठवण्यात आले. या अपघाताची नोंद करण्याचे काम खंडाळा पोलीस ठाण्यात सुरू होते.

STAR HOUSING FINANCE — Star hai toh bharosa hai

स्टार हाऊसिंग फायनान्स लिमिटेड
कॉर्पोरेट कार्यालय : ६०३, वेस्टर्न एज I, मेट्रो कॅश अँण्ड कॅरीच्या वर, बोरिवली पूर्व, मुंबई-४०० ०६६

शुद्धिपत्र

या वृत्तपत्राच्या **०२.०८.२०२५** दिनांकित अंकात **''डिमाण्ड नोटीस''**संदर्भात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातीत अ.क्र. ६च्या **''कर्जदाराचे/ सह-कर्जदाराचे/ गहाणकर्त्याचे/ हमीदाराचे नाव''** स्तंभामध्ये चुकीचा तपशील प्रसिद्ध झाला आहे. कृपया योग्य तपशील खालीलप्रमाणे वाचण्यात यावा.
श्री. गोविंद रावसाहेब कदम (अर्जदार)
श्रीमती ज्योती गोविंदराव कदम (सह-अर्जदार)
पत्ता : वनझोला कणेरगाव, ता. हिंगोली, जिल्हा हिंगोली, महाराष्ट्र-४३१ ५१३
कर्ज कोड नं. : एएसएचएचआयएन-३७
अन्य सर्व तपशील तोच राहील.

स्वाक्षरी/-
प्राधिकृत अधिकारी

MANAPPURAM HOME FINANCE LIMITED
FORMERLY MANAPPURAM HOME FINANCE PVT LTD
CIN : U65923KL2010PLC039179
नोंदणीकृत कार्यालय : IV/470A (जुने) W/638A (नवे), मणप्पुरम हाऊस, वळापाड, तिरुर, केरळ ६८०५६७
कॉर्पोरेट कार्यालय : मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेड, तिसरा मजला, युनिट नं. ३०१ ते ३१५, 'कनाकिया वॉल स्ट्रीट', अंधेरी- कुर्ला रोड, अंधेरी ईस्ट, मुंबई-४०००९३, महाराष्ट्र
फोन क्र.: ०२२-६६२११०००. **वेबसाइट :** www.manappuramhomefin.com

ताबा नोटीस (स्थावर मालमत्तासंबंधी)

ज्याप्रकारे, मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेड ('MAHOFIN') यांचे अधिकृत अधिकारी, सिक्युरिटायजेशन आणि वित्तीय संपत्त्यांचे पुनर्निर्माण आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी अधिनियम *[अधिनियम] २००२ (२००२ मधील ५४) अंतर्गत आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी नियम २००२ च्या नियम ९ नुसार, खालील स्वाक्षरीकर्त्यांकडून कर्जदार आणि सह-कर्जदारांना नोटीस दिली गेली होती की, त्यांना या नोटीसमध्ये दिलेल्या रकमेची व त्यावरील व्याजाची ६० दिवसांच्या आत परतफेड करायची आहे. कर्जदाराने रक्कम परत न केल्यामुळे, कर्जदार आणि सामान्य जनतेस सूचित करण्यात येते की, खाली दिलेल्या संपत्तीवर आम्ह्याकडून प्रतिकात्मक ताबा घेतला गेला आहे, हे अधिनियमाच्या कलम १३(४) आणि नियम ९ नुसार आम्हास प्राप्त अधिकार वापरून कर्जदार आणि सर्व जनतेस चेतावनी दिली जाते की, या संपत्तीशी संबंधित कोणतेही व्यवहार मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेडच्या कर्जराशी संबंधित असलेल्या ताराणधिकाराच्या अधीन असतील. खाली दिलेल्या प्रत्येक संपत्तीवर ताराणधिकार लावला गेला आहे :

अ. क्र.	कर्जदार व सह-कर्जदाराचे नाव/ कर्ज खाता क्र./शाखा	सुरक्षित संपत्तीचे वर्णन, ज्यावर ताराणधिकार निर्माण केला गेला आहे	मागणी नोटीस पाठविण्याची तारीख आणि बाकी रक्कम	ताबा घेण्याची तारीख
१	भाग्यश्री बळजी केंद्रे, आपाराव नानाजी मुंडे, जेजराम आप्पराव मुंडे **/31A1000LONS00000 5009844/** नांदेड	जी. पी. ह. नं. ९५, (जमीन क्षेत्र १४१९ चौरस फूट, बांधकाम क्षेत्र ९०० चौरस फूट), बाबुलगाव, पोस्ट हडोली (झं), ता. कंधार, जिल्हा नांदेड, पिन: ४३१७१४. पूर्व-हनुमान मंदिर/रस्ता, पश्चिम-स्वतःची जागा, दक्षिण-दमोदर यांचे घर, उत्तर-पुंडलीक यांचे घर, पोस्ट कार्यालय-गांव, नांदेड, महाराष्ट्र	मागणी नोटीस तारीख : १२.०५.२०२५, बाकी रक्कम : रु. ३७३४९७/-	०४.०८.२०२५
२	मंगलबाई हरिहरे गिरी, हरिहरे सखाराम गिरी **/MHL00600003751/** नांदेड	जी. पी. ह. नं. २४१, (जमीन क्षेत्र १०८९ चौरस फूट, बांधकाम क्षेत्र ८०० चौरस फूट), पिंपळगाव ढगे, ता. लोहा, जिल्हा नांदेड, लोहा, पोस्ट कार्यालय-कारेगाव, नांदेड, महाराष्ट्र, पिन: ४३१७०८. पूर्व-गोविंद भाऊराव ढगे यांचे घर, पश्चिम-रस्ता, दक्षिण-आतील रस्ता, उत्तर-रस्ता	मागणी नोटीस तारीख : १२.०५.२०२५, बाकी रक्कम : रु. ४३०८५४/-	०४.०८.२०२५

तारीख : ७ ऑगस्ट २०२५ । स्थळ : महाराष्ट्र — **अधिकृत अधिकारी, मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेड**

easy home finance

इझी होम फायनान्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: ३०२, ३रा मजला, सॅव्हॉय चेंबर्स, दत्तात्रय रोड आणि व्ही. पी. रोड (विस्तार), सांताक्रूझ पश्चिम, मुंबई ४०००५४. **सीआयएन:** यू७४९९०एमएच२०१७पीएलसी२९७८१९
वेबसाइट: www.easyhfc.com | **ईमेल:** contact@easyhomefinance.in
टोल फ्री: १८०० २२ ३२७९ | **टेलि:** +९१ २२ ३५५० ३४४२ | **टेलि:** +९१ २२ ३५२१०४८७

परिशिष्ट ४ नियम ८(१)
ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता)

ज्याअर्थी
निम्नस्वाक्षरीकार हे इझी होम फायनान्स लिमिटेड यांचे अधिकृत अधिकारी असल्याने त्यांनी सिक्युरिटीझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३ सहवाचता निर्देशित कलम १३(१२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, मागणी सूचना दिनांकित **१३ मे २०२५** जारी केली, ज्यामध्ये **श्री. स्वींद्र प्रकाश पाटील, श्रीमती कल्पना प्रकाश पाटील (कर्जदार/ सह-कर्जदार/ गहाण ठेवणारे)** यांना नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम **रु. २,८२,२९७/- (रुपये दोन लाख ब्याऐशी हजार दोनशे सत्त्याण्णव फक्त)** हे कलम १३(२) पासून देयकाच्या तारखेपर्यंतचे अतिरिक्त थकीत शुल्क आणि/ किंवा संपूर्ण वसुली सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परत करण्याचे आवाहन केले आहे.
कर्जदार/ सह-कर्जदार/ गहाण ठेवणारे रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदार/ सह-कर्जदार/ गहाण ठेवणारे आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकार यांनी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ६ आणि ८ सहवाचता निर्देशित कायद्याच्या कलम १३(४) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रतिकात्मक ताबा घेतला आहे.
कर्जदार/ सह-कर्जदार/ गहाण ठेवणारे आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की, त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी संबंधित कोणताही व्यवहार हा **रु. २,८२,२९७/- (रुपये दोन लाख ब्याऐशी हजार दोनशे सत्त्याण्णव फक्त)** पुढील थकबाकी, व्याज इत्यादी शुल्कांसह कलम १३(२) पासून देयकाच्या तारखेपर्यंत आणि/ किंवा सदर सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत पूर्ण वसुली होईपर्यंत यासाठी इझी होम फायनान्स लिमिटेड यांच्या शुल्काच्या विषयाधीन असेल. **सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात, सरफेसी कायदा, २००२ च्या कलम १३ च्या उपकलम (८) तरतुदीकडे कर्जदाराचे लक्ष वेधण्यात येत आहे.**

मालमत्तेचे परिशिष्ट
मालमत्तेचा पत्ता असलेला मालमत्ता: **घर क्रमांक ७६६, मौजे पाळधी, तालुका जामनेर, जिल्हा जळगाव** यांचे ते सर्व भाग आणि पार्सल. सर्व अधिकारांसह बांधलेली इमारत आणि फिक्स्चरचा समावेश आहे.

दिनांक: ०५.०८.२०२५, ठिकाण: जळगाव — **सही/- अधिकृत अधिकारी, इझी होम फायनान्स लिमिटेड**

युनियन बँक ऑफ इंडिया Union Bank of India — भारत सरकारचा उपक्रम
हाय टेक सिटी शाखा, क्यू ४ ए२, पहिला मजला, सायबर टॉवर्स, मधापूर, हैदराबाद-५०००८१.
सदर वृत्तपत्रामध्ये ०६.०८.२०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या
पूर्व विक्री सूचनेचे शुद्धिपत्रक
कर्जदार : मे. लक्ष्मी अँण्ड कंपनीच्या संदर्भात जारी करण्यात आलेल्या वरील सूचनेमध्ये जारी करण्यात आलेली सूचना दिनांकित २२.०५.२०२५च्या ऐवजी **१०.०६.२०२५** असे वाचावे. बाकी सूचना अपरिवर्तनीय आहे.
प्राधिकृत अधिकारी

युनियन बँक ऑफ इंडिया Union Bank of India — भारत सरकारचा उपक्रम
हाय टेक सिटी शाखा, क्यू४ ए२, पहिला मजला, सायबर टॉवर्स, मधापूर, हैदराबाद-५०००८१.
सदर वृत्तपत्रामध्ये ०६.०८.२०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या
पूर्व विक्री सूचनेचे शुद्धिपत्रक
कर्जदार : मे. माधवा स्टोरेजेसच्या संदर्भात जारी करण्यात आलेल्या वरील सूचनेमध्ये जारी करण्यात आलेली सूचना दिनांकित २२.०५.२०२५च्या ऐवजी **१०.०६.२०२५** असे वाचावे. बाकी सूचना अपरिवर्तनीय आहे.
प्राधिकृत अधिकारी

फॉर्म क्र. १४
(नियमन ३३(२))

मुंबई कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. २
(भारत सरकार, वित्त मंत्रालय)
एमटीएनएल बिल्डिंग, ३रा मजला, टेलिफोन भवन, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई-४०० ००५

वसुलीची कार्यवाही क्र. ३७, २०२४
यात
मूळ अर्ज क्र. ४७३, २०२१

आरबीएल बँक लि. ...अर्जदार/प्रमाणपत्रधारक
विरुद्ध
मेसर्स साई एन्टरप्रायझेस आणि इतर ...प्रतिवादी/प्रमाणपत्र कर्जदार
प्रति,
१. मेसर्स साई एन्टरप्रायजेस
प्रतिवादी क्र. १, नळ गल्ली, काद्राबाद, जालना
२. श्री. आनंद रावसाहेब काळे,
(प्रोप्रायटर मेसर्स साई एन्टरप्राइज)
प्रतिवादी क्र. २
नळ गल्ली, जालना, महाराष्ट्र-४३१ २०३
३. मेसर्स अभय न्यूट्रिशन प्रायव्हेट लिमिटेड
(आधीचे अभय कोटेक्स प्रायव्हेट लिमिटेड) (जामीनदार)
प्रतिवादी क्र. ३
३१, गूर मार्केट, जुना मोंढा, जालना-४३१ २०३
आणि देखील
कार्यालयाचा पत्ता - गट क्र. ८४, गुंडेवाडी, भोकरदन रोड, जालना-४३१ २०३
४. श्री. आशिष मंत्री (व्यवस्थापकीय संचालक)
प्रतिवादी क्र. ४,
डॉ. राजेंद्र प्रसाद रोड, जालना-४३१ २०३, महाराष्ट्र

एक्झिबिट क्र. : ७
पुढील तारीख : ०८.०९.२०२५

मागणी सूचना

सदर हे सूचित केले जाते की, माननीय पिठासीन अधिकारी, डीआरटी-II, मुंबई यांनी ओ.ए. क्र. ४७३, २०२१ यामध्ये काढलेल्या वसुली प्रमाणपत्रानुसार तुमच्याकडून **रु. १,९६,८९,४२७.८९/- (रुपये एक कोटी शहाण्णव लाख एकोणनव्वद हजार चारशे सत्तावीस आणि एकोणनव्वद पैसे फक्त) रक्कम थकीत आहे.** अर्जदाराला दि. २०.११.२०१९ रोजीपासून मेसर्स साई एन्टरप्रायजेस आणि इतरांकडून संयुक्तपणे आणि स्वतंत्रपणे वसूल होईपर्यंत दरवर्षी @ १०.२५% दराने भावी व्याजासह **रु. १,९६,८९,४२७.८९/- (रुपये एक कोटी शहाण्णव लाख एकोणनव्वद हजार चारशे सत्तावीस आणि एकोणनव्वद पैसे फक्त)** रक्कम वसूल करण्याचा अधिकार आहे.
तुम्हाला सूचना मिळाल्यापासून ३० दिवसांच्या आत वरील रक्कम भरण्याचे निर्देश देण्यात येत आहेत, अन्यथा कर्ज व दिवाळखोरी कायदा, १९९३ आणि त्याअंतर्गत असलेल्या नियमांनुसार वसुली केली जाईल.
वरील रकमेव्यतिरिक्त, तुम्हाला
(सी) प्रमाणपत्र/ अंमलबजावणी कार्यवाहीच्या या सूचनेनंतर लगेच सुरू होणाऱ्या कालावधीसाठी देय असलेले व्याजदेखील द्यावे लागेल.
(डी) सदर सूचना आणि वॉरन्टच्या सेवेसाठी आलेले सर्व खर्च, शुल्क आणि खर्च आणि इतर प्रक्रिया आणि देय रक्कम वसूल करण्यासाठी घेतलेल्या इतर सर्व कार्यवाही.
(ई) पुढील कार्यवाहीसाठी तुम्हाला दि. **०८.०९.२०२५रोजी दुपारी १२.०५ वाजता** निम्नस्वाक्षरीकारांसमोर हजर राहण्याचे आदेश देण्यात येत आहेत.
दिनांकित जुलै २०२५ रोजी न्यायाधिकरणाच्या शिक्क्यासह माझ्या हाती देण्यात आले

न्यायाधिकरणाचा शिक्का — शिक्का

(भविष्य कुमार आझाद)
वसुली अधिकारी
कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. २, मुंबई

homefirst — We'll take you home

Home First Finance Company India Limited
CIN: L65990MH2010PLC240703,
Website: homefirstindia.com
Phone No.: 180030008425 Email ID: loanfirst@homefirstindia.com

सेक्शन १३(२) अंतर्गत मागणी सूचना

तुम्ही, खाली नमूद केलेले ऋणको अनुसूचीत नमूद केलेली मालमत्ता गहाण ठेवून कर्ज सुविधेचा लाभ घेतला आहे आणि तुम्ही खाली नमूद केलेले कर्ज करारनाम्याकरिता ऋणको/ सह-ऋणको/ हमीदार म्हणून आहात. परिणामी तुम्ही केलेल्या कसुरीमुळे तुमच्या कर्ज खात्याचे सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (संक्षिप्तात सरफेसी ॲक्ट)च्या तरतुदींअंतर्गत ०३.०८.२०२५ रोजी नॉन-परफॉर्मिंग ॲसेट म्हणून वर्गीकरण करण्यात आले आहे. आम्ही, होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेडने तुम्ही दिलेल्या पत्त्यावर सरफेसी ॲक्टच्या सेक्शन १३(१३) यासह वाचलेल्या सेक्शन १३(२) अंतर्गत मागणी सूचना निर्गमित केली आहे. उक्त सूचना ०३.०८.२०२५ रोजीप्रमाणे निर्गमित करण्यात आल्या आहेत आणि या सूचनांमध्ये असे नमूद केले आहे की, तुम्हास मंजूर केलेल्या विविध कर्जांचे प्रदान करण्यात तुम्ही कसूर दाखविली आहे. त्यामुळे, सरफेसी ॲक्टच्या सेक्शन १३(२)च्या तरतुदीनुसार सूचना देण्याकरिता आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ३(१)च्या तरतुदींनुसार सद्य प्रसिद्धी देण्यात आली आहे :

अ. क्र.	अकाऊन्ट, ऋणको व हमीदाराचे नाव व पत्ता	अंमलबजावणी करावयाच्या सुरक्षेचा तपशील	मागणी सूचनेच्या तारखेनुसार एकूण थकीत रक्कम अधिक पुढील व्याज व अन्य खर्च (रु.त)
1.	ज्ञानेश्वर कल्याणे	फ्लॅट नं. ७, स्टिल्ट पहिला